शशिकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ वसंत पेंटर दिग्दर्शित चित्रपट कोणते? त्यातील नायक-नायिका कोण? या चित्रपटांपैकी पुरस्कारप्राप्त चित्रपट कोणकोणते?

— वसंत पेंटर यांची दिग्दर्शक म्हणून सुरुवात झाली ती मराठीत नव्हे, हिंदीत. १९४६ साली प्रभातचा *गोकुल* त्यांनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट. या चित्रपटात अनंत मराठे व कमला कोटणीस नायक-नायिका होते. त्यानंतर त्यांनी दिग्दर्शित केलेले हिंदी चित्रपट आणि त्यातील नायक-नायिका पुढीलप्रमाणे:—

सीधा रास्ता (चंद्रकांत, शाहू मोडक-कमला कोटणीस), *सती अहिल्या* (सप्रू-कमला कोटणीस), *भीष्म प्रतिज्ञा* (शाहू मोडक-नरगीस), *मुरलीवाला* (शशी कपूर-विजयालक्ष्मी), *देवयानी* (महिपाल-शकुंतला), *पतित पावन* (सप्रू-सुलोचना), *गोकुल का राजा* (रोमी-कुमकुम), *प्यार की जीत* (महिपाल-कल्पना).

१९६७चा *बारा वर्षे सहा महिने तीन दिवस* वसंत पेंटरनी दिग्दर्शित केलेला पहिला मराठी चित्रपट. सूर्यकांत-उमा या चित्रपटात नायक-नायिका होते. त्यानंतर त्यांनी दिग्दर्शित केलेले मराठी चित्रपट व त्यातील नायक-नायिका पुढीलप्रमाणे:—

टिळा लाविते मी रक्ताचा (सूर्यकांत-जयश्री गडकर), *वारणेचा वाघ* (सूर्यकांत-सुशीला), *पाच नाजूक बोटे* (अरुण सरनाईक-आसावरी), *सुगंधी कट्टा* (डॉ. श्रीराम लागू-जयश्री गडकर), *दगा* (यशवंत दत्त-उषा चव्हाण), *हे दान कुंकवाचे* (रवींद्र महाजनी-रंजना), *जखमी वाघीण* (रवींद्र महाजनी-रंजना), *थांब थांब जाऊ नको लांब* (अशोक सराफ-नंदिनी जोग).

वसंत पेंटर यांच्या मराठी चित्रपटांपैकी महाराष्ट्र सरकारच्या मराठी चित्रपट महोत्सवात पारितोषिक मिळवणारे चित्रपट पुढीलप्रमाणे:— *वारणेचा वाघ* (क्रमांक २), *सुगंधी कट्टा* (क्रमांक १), महाराष्ट्र सरकारच्या व्ही. शांताराम पुरस्कारांचा सन्मानही वसंत पेंटरना मिळाला आहे.

□ *इंटरनॅशनल क्रूक*, *लहू पुकारेगा*, *भला माणूस*, *धुंद*, *उजाला ही उजाला*, *आँधिया*, *जरा बच के*, *प्यासी आँखे* या चित्रपटांतील नायक-नायिका कोण? दिग्दर्शक कोण?

— *इंटरनॅशनल क्रूक*मध्ये धर्मेंद्र व सायराबानू नायक-नायिका होते. दिग्दर्शक पाछी.

लहू पुकारेगा या नावाचा चित्रपट दोनदा आला. १९६८ला पहिला नायक-नायिका सुजीतकुमार-शबनम, दिग्दर्शक एस. एन. त्रिपाठी, १९८० ला दुसरा. नायक-नायिका सुनील दत्त-सायरा बानू, दिग्दर्शक अख्तर उलइमान.

*भला माणूस*मध्ये रणधीर कपूर-नीतू सिंग नायक-नायिका होते. दिग्दर्शक विश्वामित्र.

*धुंद*मध्ये संजय खान-झीनत अमान नायक-नायिका होते. दिग्दर्शक बी. आर. चोप्रा.

*उजाला ही उजाला*मध्ये विनोद मेहरा-योगिता बाली नायक-नायिका होते. दिग्दर्शक एस. एम. सागर.

आँधिया नावाचा चित्रपट दोनदा आला. १९५२ला पहिला नायक देव आनंद, नायिका निम्मी, कल्पना कार्तिक, दिग्दर्शक चेतन आनंद. १९९०ला दुसरा नायक-नायिका शत्रुघ्न सिन्हा-मुमताज, दिग्दर्शक पहेलाज निहलानी.

*जरा बचके*मध्ये सुरेश-नंदा नायक-नायिका होते. दिग्दर्शक एन. ए. अन्सारी.

*प्यासी आँखे*मध्ये अमोल पालेकर-शबाना आझमी नायक-नायिका होते, दिग्दर्शक राम केळकर. त्यांनी *एकटी* या मराठी चित्रपटावरून हा चित्रपट हिंदीत दिग्दर्शित केला होता. *एकटी*चे ते लेखक होते.

शशिकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ शर्मिला टागोरने राजेश खन्नाबरोबर कोणकोणत्या चित्रपटात नायिकेची भूमिका केली? या चित्रपटांचे दिग्दर्शक कोण?



आराधनामध्ये शर्मिला टागोर - राजेश खन्ना

— *आराधना*, *दाग*, *अमर प्रेम*, *सफर*, *मालिक*, *आविष्कार*, *राजा रानी*, *त्याग* या चित्रपटात शर्मिला राजेश खन्नाबरोबर नायिकेच्या भूमिकेत चमकली. या चित्रपटांपैकी *आराधना*, *अमर प्रेम* या चित्रपटांचे दिग्दर्शक होते शक्ती सामंता, *दाग*चे दिग्दर्शक यश चोप्रा, *सफर*चे दिग्दर्शक असित सेन, *मालिक*चे दिग्दर्शक ए. भीमसिंह, *आविष्कार*चे दिग्दर्शक वासु भट्टाचार्य, *राजा रानी*चे दिग्दर्शक सचिन भौमिक.

पी. एस. म्हापसेकर, म्हापसा गोवा.

□ संगीतकार दत्ताराम यांनी कोणकोणत्या चित्रपटांना संगीत दिलं? सध्या ते कोठे आहेत?

— *अब दिल्ली दूर नही*, *परवरिश*, *कैदी नं. ९११*, *संतान*, *काला आदमी*, *श्रीमान सत्यवादी*, *डार्क स्ट्रीट*, *फर्स्ट लव्ह*, *जिंदगी और ख्वाब*, *नीली आँखे*, *राका*, *जबसे तुम्हे देखा है*, *टार्जन कम्स टू दिल्ली*, *फरिस्ता*, *बालक*, *बेकसूर*, *चोरो का चोर*, *एक दिन आधी रात* हे दत्तारामनी संगीतबद्ध केलेले चित्रपट.

भरत चंद्राकांत कालुवाला, माहीम कॉजवे.

□ 'दोस्त बनके आये हो...' हे रफी व लता मंगेशकर यांनी गायलेलं गाणं कोणत्या चित्रपटातील? कलाकार, गीतकार, संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक कोण?

— हे गाणं १९७१ *बिन फेरे हम तेरे* या चित्रपटातील. पण ते रफीबरोबर लता मंगेशकर यांनी नव्हे तर उषा खन्नाने गायलं होतं. आशा पारेख, राजेंद्रकुमार, विनोद मेहरा, सारिका नादिरा, जानकीदास, नाजनीन या चित्रपटातील प्रमुख कलाकार होते. गीतकार असद भूपाली, संगीतकार उषा खन्ना, निर्माता एन. पी. सिंग, दिग्दर्शक रजत रक्षित.

जय विजय कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ 'ऐ मेरे वतन के लोगो...' हे गाणं कोणत्या चित्रपटातील? गायक कोण?

— हे गाणं कोणत्याही चित्रपटातील नाही. भारत-चीन युद्धाच्या वेळी जवानांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्यासाठी चित्रपट कलावंतांनी दिल्लीला मनोरंजनाचा एक कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी कवी प्रदीपनी एक कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी कवी प्रदीपनी हे गाणं लिहिलं होतं आणि ते सी. रामचंद्र यांच्या संगीतात लताबाईंनी गायलं होतं. लताबाईंच्या आवाजात हे गाणं ऐकताना पं. नेहरूंचे डोळे पाणावले होते. या गाण्याचं हे एक वेगळं ऐतिहासिक महत्त्व आहे.